**RNI No. MAHBIL /2009/31733**
**Reg. No. MCS/173/2016-18**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

**वर्ष ३, अंक २८(३)]** **गुरुवार, एप्रिल ६, २०१७/चैत्र १६, शके १९३९** **[पृष्ठ ८, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक ३६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल २०१७.

**अधिसूचना**

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक सीआरसी. २५१७/प्र.क्र.७९/का. बारा.— फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, (१९७४ चा २) महाराष्ट्र राज्यात अंमलात असताना, त्यांच्या कलम ७ तसेच कलम ९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत पूर्वी काढलेल्या सर्व शासकीय अधिसूचनांचा वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट आणि समुद्रपूर महसूली तालुक्यांशी त्यांचा जेथवर संबंध असेल, तेथवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याशी विचारविनिमय करून, याद्वारे दिनांक ३ एप्रिल, २०१७ पासून, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट व समुद्रपूर येथे महसूली तहसिलाकरिता एक सत्र विभाग निर्माण करीत आहे आणि उक्त सत्र विभागाच्या हद्दीमध्ये उद्‌भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी अतिरिक्त सत्र न्यायाधीश ज्यांचे अध्यक्ष असतील, असे सत्र न्यायालय हिंगणघाट येथे स्थापन करीत आहे. प्रमुख सत्र न्यायाधीश वर्धा देखिल हिंगणघाट सत्र विभागाचे सत्र न्यायाधीश असतील आणि त्यांना, उक्त सत्र विभागामध्ये प्रकरणांतील अधिकार स्वतःहून काढून घेण्याचे किंवा सलग अधिकारितेच्या इतर कोणत्याही न्यायालयास नेमून देण्याचे किंवा, त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही प्रकरणांत हिंगणघाट येथे सहायक किंवा अपर सत्र न्यायाधीश नेमून देण्याचे अधिकार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नीरज धोटे,**
शासनाचे सहसचिव व विधि सल्लागार.